REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 3 | DECEMBER – 2017

# 'गुडदाणी'मधील विद्रोहाचे स्वरूप

**प्रा. डॉ. राजेंद्र खंदारे**
**सहयोगी प्राध्यापक , स.म. शंकरराव मोहिते-पाटील महाविद्यालय, नातेपुते.**

**प्रस्तावना :**

महाराष्ट्रारात आंबेडकरवादी चळवळीने मूळ धरले आणि दलितांची अस्मिता जागृत झाली. या दलित अस्मितेला वाङ्मयीन आविष्कार म्हणून दलित साहित्य हा स्वतंत्र वाङ्मयीन प्रवाह पुढे आला. वेदना आणि विद्रोह ही दलित साहित्याच्या वाङ्मयीन आविष्काराची वैशिष्ट्ये. आजपर्यंत अस्पृश्यतेचा व त्यामुळेच वाट्याला येणा-या दारिद्र्याच्या, उपेक्षेच्या, मानहानीच्या वेदना सोसणा-या दलितांत जाणीव जागृती झाली आणि या शोषणाविरुद्ध लढा उभारला. सर्वप्रथम या शोषणाचे वास्तवचित्र जनतेपुढे मांडावे आणि या शोषणाच्या, अन्यायाविरुद्ध बंडाचा झेंडा फडकावावा ह्या दुहेरी जाणिवांतून दलित साहित्य वाटचाल करू लागले.

दलित साहित्याने आपली बोली भाषा हेच वाङ्मयाचे माध्यम ठरविले. याबाबत शिष्ठजनांचे संकेत झुगारून दिले.कथाकाव्यात नवी प्रतिमानसृष्टी उभारली. जुन्या कथा, मिथांचे नवे अर्थ लावले गेले. पुराणकथांतील सूतपुत्र कर्णाची वेदना आणि निष्ठावान धनुर्धारी एकलव्याच्या वाट्याला आलेला अन्याय हा दलितांना आपल्या वेदनेचे पूर्वरूप म्हणून जवळचा वाटू लागला आणि ही समवेदना वाङ्मयरूप घेऊन पुढे आली.मध्यमवर्गीयांच्या कथाविश्वातले कथाविषय बाजूला पडून भूक, दारिद्र्य, अस्पृश्यता हे कथाविषय होऊ लागले. दलित कष्टक-यांच्या भावविश्वातली प्रतिमानसृष्टी वाङ्मयरूप घेऊ लागली.

मराठी कथासाहित्यात दलित कथेचा नवा प्रवाह रूढ करण्यात योगीराज वाघमारे हे अग्रभागी आहेत असे म्हणता येईल. योगीराज वाघमारे यांनी जे कथालेखन केले आहे ते बुद्ध, फुले, आंबेडकर यांच्या समाज परिवर्तनाच्या विचाराने लेखन करतात. स्वातंत्र्य, समता, बंधुता व सामाजिक न्यायाची विचारधारा अनेक परिवर्तनवादी लेखकांना डॉ.आंबेडकरांच्यामुळे मिळाली.अनेक बदलत्या स्थित्यंतरांचा सामाजिक बोध त्यांनी समाजचित्रणातून दिला. साचेबंद विचारांना दूर सारून तटस्थता, समंजसपणा व समतोल दृष्टिकोनातून कथालेखन झालेले दिसते.

बौद्धाचे तत्त्वज्ञान दलित समाजाचे मौलवान धन आहे हे सर्व दलित लेखकांनी ध्यानात ठेऊन साहित्याची निर्मिती करणे गरजेचे आहे. या विषयी मे.पु.रेगे म्हणतात, 'दलित वा नवबौद्ध समाजाचा जिवंत अनुभव जर साहित्यात पडायचा असेल तर तो त्याच्याकडूनच पडला पाहिज'[१] ज्या मूल्यांवर समाज आधारलेला आहे. ती मूल्ये स्वीकारली पाहिजे, उलट आपण असे दाखवू शकू, की ही मूल्ये स्वीकारल्यामुळे त्या व्यक्तीचया प्रामाणिकपणे जगण्याच्या प्रयत्नात कुठे तरी कमतरता राहते.

दलित लेखकांनी समाजाला पुढे घेऊन जायचे असेल तर केवळ नकारात्मकता वा निषेध यांना एकमेव आधार न मानता विधायक विचारप्रणालीचा स्वीकार करणे गरजेचे आहे. हीच विधायक विचारप्रणालीचा स्वीकार करून योगिराज वाघमारेंनी कथालेखन केले आहे असे म्हणता येईल. डॉ. आंबेडकरांच्या विचारप्रणालीचा आनुयायी बनून त्याच्या विचार-तत्त्वज्ञानाला बळ मिळवून देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. बौद्ध जीवनमूल्यांची कास धरल्यास दलित समाजाचे केवळ नकारात्मक विचारापासून संरक्षण होईल. त्याशिवाय दलित समाज महान स्वप्न बघू शकणार नाही याचे भान सदैव ठेवून योगिराज वाघमारे कथालेखन केले आहे असे म्हणता येईल.




दलित समाजाला साहित्यिकांपेक्षा निष्ठावंत विचारावंतांची अधिक गरज आहे. प्रामाणिकपणे आपल्या जीवनानुभवाकडे पाहण्याची जी एक शिस्त व संयम लागतो ती जर लेखकाकडे असेल तर भावविवश म्हणजेच सेंटीमेंटल साहित्य निर्माण होण्याचा धोका आहे. त्यासाठी तटस्थवृत्ती असणे आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संत तुकाराम यांच्या वचनाचा संदर्भ देत प्रश्न विचारतात, ''काय तुमचे वाङ्मय? हाक मारूनी सांगे तुका! नाम घेतल्याविना राहू नका!! ह्या पलिकडे काय आहे नाम घेऊन तुमचे काय काम होणार आहे.[२]

**गुडदाणी मधील विद्रोहाचे स्वरुप :**

परंपरेने डोळे मिटून स्वीकारलेल्या साहित्यविषयक कलाविषयक समीक्षाविषयक आणि साक्षात इतिहासविषयक कल्पनांना एखाद्या स्फोटासारखा नकार देत विद्रोही साहित्य ज्वालांच्या इंद्रधनुष्यासारखं मराठी साहित्याच्या आकाशात दिसायला लागलं. केशवसुतांच्याच भाषेत सांगायचे झाले तर **परि एक एक जो नवा शब्द तू शिकसी , श्क्ती तयाची उलथिल सर्व जगासी** या ओळीचा जबरदस्त प्रत्यय आला. दलित जीवनातल्या दुःखाचं यापूर्वी दर्शन घडलं नव्हतं असे नाही. या बाबतीत माटे मास्तरांचा उल्लेख जरूर करायला हवा; हे दर्शन आणि आंबेडकरी प्रेरणेतून उभ्या राहिलेल्या या नव्या कवींनी, कथाकारांनी आणि आत्मचरित्रकारांनी घडविलेले दर्शन यात जमीन आस्मानाचा फरक होता. आजवर हे सद्हेतूनंच घडवलेलं होतं, त्यामागं प्रयोजन दलितेतर समाजात दलितांविषयी सहानुभूती निर्माण व्हावी हे होतं. त्यात जुन्या बुरसटलेल्या शोषक जगाला उलथविण्याची शक्ती निर्माण व्हायला पाहिजे, ही आच नव्हती. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी नवा शब्द शिकवला आणि त्यातून जुनं जग उलथवण्याची शक्ती असते असं साहित्य उभं राहिलं. तो शब्द म्हणजे धम्म या शब्दांनं समाजात माणसांचं श्रेष्ठत्व आणि ऐहिकता या सर्वात महत्त्वाच्या मूल्यांची प्राणप्रतिष्ठा केली. या नव्या जीवनमूल्यांना त्यांनी धम्म म्हटलं बाबासाहेबांनी धर्माचा त्याग करून दुसरा धर्म स्वीकारला असं झालं नाही, तर निखळ आणि करुणेचं त्यांना जिथे अपूर्व मिश्रण आढळलं, त्या तत्त्वज्ञानाचा त्यांनी स्वीकार केला.

गावकुसाबाहेर राहणा-यांना गावातला माणूस ठाऊक होता तो आपल्या रक्त फुटेस्तोर कष्ट करायला लावून मोठा उपकार केल्यासारखा शिळ्या भाकरीचा तुकडा टाकणारा, आपल्या सावलीलासुद्धा अपवित्र मानणारा असा एक हुकूमशहा एवढंच आणि गावातल्या माणसांच्या लेखी गावकुसाबाहे राहणारा माणूस म्हणजे दारोदार झाडलोटीपासून ते मलमूत्रांची घाण उपसण्याची नियतं कर्म कुरु ही साक्षात भगवंताची आज्ञा पाळण्याशिवाय गत्यंतर नसलेला आणि बरेचसे कष्ट नि भूतदयेपोटी घातलेली भीक एवढ्यावरच जगणारा एक मनुष्यधारी प्राणी एवढंच ठाऊक असायचं. अशा उन्मत्तांच्या टाचेखाली रगडल्या जाणा-या माणसाला माणुसकीच्या प्राथमिक हक्कांसाठी लढणारा सैनिक म्हणून उभं करणं हे एक दिव्य होतं. बाबासाहेबांनी ते करून दाखवलं.

चवदार तळ्याचं पाणी सर्वांना वापरायला द्यायची घोषणा म्हणजे बाबासाहेबांनी आंधळ्या रूढी पाळणा-या आमानुषांना निखळ सुंदर माणसं बनण्याची दिलेली एक सुवर्णसंधी होती. आज आपण ज्याला विद्रोही दलित साहित्य म्हणतो, त्याच्या निर्मितीमागची शक्तीही बाबासाहेबांनी जागवलेल्या या आत्मविश्वासातून लाभलेली आहे. असे म्हणता येईल. या घटनेपासून दलित समाजात जे नवचैतन्य निर्माण झाले त्यातूनच आपल्या जीवनाची कथा ही कुठल्याही सहानुभूतीची, दयेची किंवा औदर्याची अपेक्षा न बाळगता रोखठोकपणे मांडली गेली.

जिथे धर्म, जात, वर्ण, वर्ग या शक्ती छळण्यासाठी वापल्या जातात, तिथे त्या प्रवृत्तींचा नाश करण्यासाठी शस्त्र म्हणून जेव्हा शब्द वापरले जातात त्या क्षणी दलित साहित्याचा जन्म होतो. त्या साहित्यिकाचा जन्म कुठल्यातरी जातीत आणि कुठल्या तरी धर्मात झाला याचा इथे काहीही संबंध नाही. शोषण, उपेक्षा, जन्मावरून उच्च-नीच भेद ठरविणा-या रूढी यांचा बीमोड करायला उठलेलं हे साहित्य फक्त माणुसकीला मानतं. विद्रोहाला मानतं. मग तो विद्रोह स्त्री-मुक्तीविषयक असो, स्पृश्यास्पृश्य भेदाविरूद्ध असो, भटक्यांच्या जीवनातल्या यातनांबद्दल असो, नरकाची आणि स्वर्गाची भूरळ घालून फसवणा-या बुवा-बाबाबद्दल असो या अनिष्ट गोष्टींशी विद्रोहाची भूमिका घेऊन जे साहित्य उभं राहतं ते साहित्य.

बाबासाहेबांचा जीवनातला प्रवास ग्रंथाकडून ग्रंथाकडे असा झाला नाही. ग्रंथाकडून जीवनाकडे आणि जीवनाकडून ग्रंथाकडे अशी त्यांची परिक्रमा चालली होती.

मराठी विद्रोही साहित्य हे अल्पसंख्य दलितांच्या अनुभवाचे साहित्य आहे.विद्रोही साहित्याचे ध्येय समाजाच्या अपराधी मनाची अभिव्यक्ती करणे हे असते. विद्रोही साहित्य हे विद्रोह्य किंवा विद्रोहविषय झालेल्या समाजालाही उद्देशून असते. याचा अर्थ कुणाचीही आणि कोणतीही वाङ्मयीन अभिव्यक्ती एका वैश्विक वाचकासाठी व वैश्विक काळासाठी जन्मलेली असते. पीडित समाजाच्या व्यथावेदनांची चित्रे हा मुख्य आशय डोळ्यासमोर ठेवून विद्रोही साहित्याची निर्मिती होत असते. ह्या साहित्याचा आशय विद्रोही असल्यामुळे वाचकांना सहजपणे समजतो.

संत ज्ञानेश्वरांपासून तुकोबापर्यंत सर्व संतांनी स्त्रीशूद्रांना सहानुभूतीने थोपाटले.पण हे थोपाटणे आजच्या दलित तरुणांच्या मनाला अस्वस्थ करणारे आहे. दलितांच्या वेदनेला त्यांच्या व्यथांना आणि त्यांच्या प्रश्नांना आजवर असेच थोपाटत आणले आहे आणि आणले जात आहे.

गुडदाणी या कथासग्रहाला ज्येष्ठ आंबेडकरी विचारवंत राजा ढाले यांची प्रदीर्घ प्रस्तावना लाभली आहे. या कथासंग्रहाची पहिली आवृत्ती १९८३ मध्ये प्रसिद्ध झाली होती. या कथा संग्रहामध्ये एकूण दहा कथा असून दलित समाजजीवनाचे दाहक चित्रण त्यात करण्यात आले आहे.

बाबूराव बागुल यांचे समग्र साहित्य हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समाजाक्रांतीतंत्राचा आविष्कार आहे दलित चळवळ ही मानवकेंद्रीत बनावी, नतदृष्टसंस्कृती नाकारीत निने दलित मानसिकता गतीशील करावी परकीय वैदिक मूल्यांना नकार द्यावा मूळ भारतीय स्वातंत्र्याचा लढा लढण्यासाठी सज्ज व्हावे ही भूमिका बागुलांनी कुणाचीही तमा न बाळगता स्पष्ट केली आहे. पूराणमूल्यांना तितक्याच जोरदारपणे नाकारले आहे.

कथेने निर्माण केलेल्या गरजा आपल्या लक्षात येतात. उदा. **'होरपळ'** मधील ज्या तात्यांनी 'गावकी सोडा महारांनो स्वाभिमानानं जगा मुला-मुलींना शाळेत घाला' 'एक व्हा! संघटित व्हा! शिका आणि स्वाभिमानाने जगा.' 'जयभीम तू गडी, वेळेवरती हरघडी घे उडी!, हक्कासाठी रणामध्ये घे उडी! मागास मुलं शिकून पुढे गेली पाहिजेत बाबासाहेबांचे विचार प्रत्यक्ष आचरणात आणल्याशिवाय परिर्वतन होणे शक्य नाही. या विचाराने प्रेरित होऊन चळवळीचे काम करणा-या तात्याच्या नशिबी काय तर हाल आपेष्टा सर्वाचे लग्न जुळवून देणारा तात्याला अन्न वस्त्र यामुलभूत गरजाही भागवता येत नाही. 'ज्यांनी संपूर्ण आयुष्य समाजासाठी वेचलं, संसार , घर-दार, आशा आकांक्षा सारं होरपळून टाकलं. दुस-यांचे संसार सुखाचे व्हावेत म्हणून जेल, सत्याग्रह, लाठीकाठी झेलली त्या तात्यांच्या एका मुलीचे लग्न होणे होणं अशक्य.' ज्या घरात गावकी सोडण्याची शपथ घेतली, ज्या घारात बौद्धधम्माची दीक्षेची शपथ घेतली होती. ज्या घरात क्रांती सुरूवात झाली होती त्या घराची, घरापुढच्या लिंबांच्या झाडाची आवस्था विचित्र झाली. त्यांची मुलगी लता तर समोर येऊ शकली नाही कारण तिच्या अंगावर कपडेही नव्हते. गरिबीमुळे शिक्षण नाही. शिक्षण नाही म्हणून नोकरी नाही. नोकरी नाही म्हणून लग्न नाही. अशा पेचात अडकलेली अवस्था मनाला स्पर्शून जाते. तात्याची त्यांची मुलगी यांची नेमकी कोणती गरज आहे हे समजून घेणे महत्त्वाचे वाटते. शिक्षणामुळे नोकरी मिळाली नोकरीमुळे इतर जातीची मुलगी पत्नी म्हणून मिळाली. पण स्वजातीतल्या मुलीची अवस्था अंधारात गाडून टाकणारी झाली. हे प्रखर वास्तव योगिराज वाघमारे या कथेतून मांडतात. तात्याची समस्या म्हणजे चळवळीला आलेले अपयश आहे. वा चळवळीची मर्यादा दाखवणारी आहे.

लांडगे : या कथेत बौद्ध धर्माचा पाडाव करण्यासठी जसे खोटे अनुयायी धम्मामध्ये प्रवेश करून धम्म आतून पोखरला त्याप्रमाणेच आंबेडकरी चळवळीला संपुष्टात आणण्यासाठी अनेक मुखवटे धारण करून इतर धमातले कार्यकर्ते चळवळीमध्ये प्रवेश करून चळवळीलचा धार बोघटवण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळेच चळवळ योग्य दिशेने न जाता भलतीकडेच भरकटत जावी अशी योजना केली जाते. विजय सारखे मुद्दाम धम्मात आलेल्या तरूणाकडून दलित स्त्री समस्य या विष्यावर क्रांतीकारक विचार मांडू पाहणा-या मीस कांबळे या बुद्धिमान असणा-या कार्यकर्तीला कसे फसवले जाते व चळवळीची धार कशी बोथट करता केली जाते हे या कथेतून योगिराज वाघमारे यांनी आधोरेख्ति केले आहे. समाज परिवर्तनाचे वा क्रांतीचे अर्धवट फिरलेले चाक पूर्ण फिरवण्यासाठी चळवळीमध्ये सहभागी होणा-या कार्यकर्त्यांनी क्रांतीकारक विचाराबरोबर विचार उच्चार आणि वर्तन याकडे काटेकोरपणे जपणे आवश्यक आहे. त्याच बरोबर शील हेही जपणे तितकेच महत्त्वाचे आहे. चळवळीचे वा संघटनेचे नेतृत्त्व करणा-यांनी जर या गोष्टीकडे दुर्लक्ष केले तर चळवळ व संघटनेला ओहोटी लागल्याशिवाय राहणार नाही. त्यातूनच मीस कांबळे यासारख्या कार्यकर्तीला लैगिक शोषणाला वारंवार बळी पडावे लागते.

सामाजिक मूल्यांचा स्वीकार करीत असताना आंबेडकरी तत्त्वापसून दूर जाणारा नायक दिसत नाही. उलट शेवटी या तत्त्वाचा स्वीकार करणारे नायक कथेत आलेले आहे.उदा.'मला जायलाच पाहिजे' आणि 'गुडदाणी' 'मला जायलाच पाहिजे' कथेतील दादा आणि अरूण ह्या दोन व्यक्तिरेखा आंबेडकरांच्या तत्त्वाचा स्वीकार करताना दिसतात. गावात राहणारा सदाशिव हा मात्र परंपरेत अडकलेला दिसतो. त्याची विचारसरणी कुणाशीच विरोध न करता शरणवृत्तीचा स्वीकार करून जीवन जगावे. 'अरूणला देवाच्या दयेने नोकरी मिळाली आहे मस्तपैकी नोकरी करावी. कुणाशी उणं बोलू नये. कुणाच्या डोळ्यावर येईल असे वागू नये. आपण भले आणि आपली नोकरी भली. काय कराचये दुसरे उद्योगधंदे?' त्याला चळवळ आंबेडकरांचे विचार याच्याशी काही देणे घेणे नाही. या कथेमध्ये येथे योगिराज वाघमारे आंबेडकरी जनतेचे दोन वर्ग कशा प्रकारचे वर्तन करतात हे आपल्या लाक्षात आणून देतात.अरूण हा बाबासाहेबांच्या विचाराचा पूणतः स्वीकार केल्याशिवाय आपल्याला न्याय मिळू शकत नाही या विचारावर ठाम राहताना दिसतो त्याचे वडील दादा हेदेखील अरूणच्याच मार्गावरून वाटचाल करताना दिसतात. आंबेडकरी चळवळीचे महत्त्व पटल्यानेच परिवर्तन हे केवळ

'गुडदाणी' कथेतील कथानायक मी हा आजीच्या परडीतले देव मोडून गुडदाणी खाण्याची हौस भागवतो. एरवी आजीच्या संचारणारी दैवीशक्ती नातवाच्या अशा वागण्यामुळे अंगात संचारत नाही. शापवाणी ही देत नाही. तिच्या अंगातलाी दैवी शक्ती कायमचीच निघून जाते. येथे डॉ. बाबासाहेबाच्या विचाराचा स्वीकार करणारी आजी आपल्या लक्षात येते. प्रस्तावनेत राजा ढाले म्हणतात त्याप्रमाणे तीन पिढ्यांचा सांस्कृतिक संघर्ष प्रभावीपणे चित्रित झालेला आहे.

बाबासाहेबाच्या विचारांनी दलित समाज जागृत होऊ लागला आहे. त्याला आत्मभान येऊ लागले आहे. स्वाभिमान, स्वावलंबन व स्व उद्धार या त्रयीमुळे दलित समाजाची अस्मिता जागृत झाली आहे. दलितांच्या जीवनात व सामाजिक संबंधात स्थित्यंतरे होऊ लागली आहेत. याविषयीची स्पंदने या कथेतून व्यक्त झाली आहेत.

अष्टौप्रहार कष्टाचा मोबदला म्हणून महारांच्या वतनी- जमिनीचा हक्क सांगणा-यांना शेवटी गावक-यांकडून कशी वागणूक मिळते हे 'भूमिहीन' मध्यल्या सिरपा या व्यक्तिरेखेतून आधोरेखित होते. वतीन जमिनी हेच उपजिवेकेचे साधन तेही हिरावून घेतले गेल्याने निर्माण होणारी हतबलता या कथेतून व्यक्त झाली आहे.या प्रकारच्या शोषणापासून दूर जाण्याचा एकमेव पर्याय म्हणजे गाव सोडून शहारामध्ये स्थलांतर होणे. बत्ताशा मुंबईला जाऊन कामगाराचा ठेकेदार होतो आपणही मुंबईला गेले पाहिजे हा विचार प्रेरित करून **'यंत्र'** कथा थांबते.

'लिंबाजी' या कथेतून आजही गावपातळीवर दलित स्त्रीचे होणारे लैंगिक शोषण त्यात दुष्काळांनी घातलेल्या हौदोमुळे हैराण झालेले दलितांना शेवटी गाव सोडून शहराकडे जाण्याशिवाय दुसरा मार्ग दिसत नाही. लिंबाजी फौजदाराच्या मनात वाड्याविषयीचे प्रेम इद्यापीठवाल्याकडून कसे उद्धवस्त केले जाते. सिरपा असेल, वामन असेल, लिंबाजी असेल या सर्वांना गावातून सैरभैर व्हावे लागते.

पारंपरिक व्यवसायामुळे आपली जात स्वाभिमानशून्य व तिरस्कृत बनल्याची जाणीव कथानायकांत आहे. हे कथानायकांच्या विचारमागे, कृतीमागे आंबेडकरी विचार, तत्त्वज्ञानात लपले आहे.

## निष्कर्ष :

१. योगिराज वाघमारे यांची कथा जिथे संपते तेथूनच त्यांच्या कथेचा प्रारंभ होतो.

२. समीक्षेकडून उपेक्षित असणारा पण महत्त्वाचा कथाकार

३. समकालीन लेखकापेक्षा वा कथाकारापेक्षा वेगळा कथाका म्हणून वाघमारे यांचा उल्लेख करात येईल.

४. शिक्षणाचा पदर हाताशी धरूनही स्व समाजातल्या समस्यांचा बोध होत नाही ही मर्यादा **होरपळ** या कथेतून. मांडलेली आहे.

५. सुशिक्षीत बेकारीबरोबर अशिक्षीत बेकारीचा प्रश्न **यंत्र** या कथेतून उपस्थित केला आहे. यंत्रयुगीन संस्कृती आणि बेकारी यांच्यातला संघर्ष वामन आणि मळणी मशिन यांच्या रूपाने आलेला आहे. आनंद यादवाची गोतावळा या कादंबरीतून हा प्रश्न उपस्थित करून शेतकामगारावर या यंत्रयुगाचा कोणता परिणाम होतो हे स्पष्ट केले आहे.

## संदर्भ :

१. जाधव रा.ग."मराठी दलित साहित्याची मीमांसा" 'निळीपहाट', श्रीविद्या प्रकाशन, पुणे.,पृ.क्र.५.

२. जाधव रा.ग."मराठी दलित साहित्याची मीमांसा" 'निळीपहाट', उ.नि. पृ.क्र. १२.